**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
**व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या बैठकीचा (५७ व्या बैठकीचा) कार्यवृत्तांत**
**बुधवार, दि.१५ जानेवारी, २०१४ दुपारी ०१:०० वा.**

**व्यवस्थापन परिषदेची तातडीची बैठक (५७ वी बैठक) बुधवार, दि.१५ जानेवारी, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. धुत्तगाव एस. सी. | सदस्य |
| ६) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १०) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १३) | डॉ. लोणीकर एस. व्ही., प्र. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. अनपट एस. बी., प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

स्थायी समितीने प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. व डॉ. करचे बी. आर. यांचे व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशन केल्यानंतरची व श्री. अनपट एस. बी. यांच्याकडे वित्त व लेखा अधिकारी तर डॉ. लोणीकर एस. व्ही. यांच्याकडे परीक्षा नियंत्रक या पदाचा अतिरिक्त पदभार दिल्यानंतरची व्यवस्थापन परिषदेची ही पहिली बैठक असल्याने या सर्वांचा मा. कुलगुरुमहोदयांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**अनुपस्थितीः**

डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. यांनी दूरध्वनीद्वारे व सौ. मोहिते-पाटील पी. पी. यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित राहणार असल्याचे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. याशिवाय अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी, विभागीय सहसंचालिका, सोलापूर विभाग, सोलापूर (मा.शिक्षण संचालक पुणे यांचे प्रतिनिधी) प्राचार्य श्री. पवार एस. के. हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ]** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ अन्वये, गठीत केलेल्या वित्त व लेखाधिकारी या पदासाठी निवड समितीने केलेली शिफारस मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयास्तव.**

(टिपणी: विद्यापीठात वित्त व लेखाधिकारी हे पद भरण्यासाठी ऐ. आय. यु. युनिव्हरसिटी न्युज, विविध वर्तमानपत्रात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र. SUS/Est./०५/२०१३-१४ दि.२१/१०/२०१३ अन्वये प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची छाननी करुन, महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ अन्वये, गठीत केलेल्या निवड समितीची बैठक दि.१०/०१/२०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती. उक्त निवड समितीने उमेदवारांच्या मुलाखती घेवून उमेदवाराच्या नावाची शिफारस गोपनीयरित्या केलेली असून सदरील शिफारस मोहरबंद लिफाफ्यासह सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७९ अन्वये, गठीत केलेल्या वित्त व लेखाधिकारी या पदासाठी निवड समितीच्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २० (१) (b) अन्वये, मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयास्तव सादर).

**ठराव :** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७९ अन्वये, वित्त व लेखाधिकारी या पदाच्या निवडीसाठी गठीत केलेल्या निवड समितीने डॉ. बी. डी. कऱ्हाड यांच्या नियुक्तीची केलेली शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

[ ०२ ] **सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषय घेऊन बी. ए. भाग १ ते ३ मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी प्रा.जी. एस. हारकुड अक्कलकोट सुवर्णपदक देण्यास व त्याकरीता रु.१,००,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार, मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः प्रा. जी. एस. हारकुड यांनी सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषय घेऊन बी. ए. भाग १ ते ३ मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी **प्रा.जी.एस हारकुड अक्कलकोट सुवर्णपदक** या नावाने सवुर्णपदक देण्यासाठी दिनांक २६/१२/२०१३ रोजीच्या पत्रासोबत रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख) ची देणगी विद्यापीठास दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला आहे.

व्यवस्थापन परिषदेची बैठकीची तारीख दरम्यानच्या कालावधीमध्ये निश्चित न झाल्यामुळे प्रा. जी. एस. हारकुड यांच्याकडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात प्राप्त झालेला रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख) चा धनादेश स्विकारुन सुवर्णपदक देण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी दिनांक ३१/१२/२०१३ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला आहे.

सबब, मा.कुलगुरु महोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्वप्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी वै. रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे या नावाने सुवर्णपदक देण्यास व त्याकरिता रु.१,००,०००/- प्राप्त देणगी स्विकारण्यास म. वि. कायदा १९९४ कलम १४(७) नुसार, मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: डॉ. उर्मिला यशवंत बोधे, सोलापूर यांनी सोलापूर विद्यापीठ संलग्नित सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून बी.एड. पदवी मध्ये गुणानुक्रमे विद्यापीठात सर्व प्रथम येणाऱ्या स्नातकास प्रत्येक वर्षी **वै. रामचंद्र बाळकृष्ण बोधे अर्थात भाऊसाहेब बोधे सुवर्णपदक** या नावाने सवुर्णपदक देण्यासाठी दिनांक १७/१२/२०१३ रोजीच्या पत्रासोबत रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख) ची देणगी विद्यापीठास दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी वरील नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला आहे.

व्यवस्थापन परिषदेची बैठकीची तारीख दरम्यानच्या कालावधीमध्ये निश्चित न झाल्यामुळे डॉ. उर्मिला यशवंत बोधे याच्या कडून सुवर्णपदक देण्यासंदर्भात प्राप्त झालेला रु.१,००,०००/- (अक्षरी एक लाख) चा धनादेश स्विकारुन सुवर्णपदक देण्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी दिनांक ४/१/२०१४ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्राप्त झालेला धनादेश वित्त व लेखा विभागात जमा करण्यात आला आहे.

सबब, मा.कुलगुरु महोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ] विद्यापीठ अधिविभागामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास सहलीच्या वेळी मंजूर करण्यात येणाऱ्या Pocket allowance मध्ये वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ अधिविभागामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परवानगीने आयोजित करण्यात येत असलेल्या अभ्यास सहलीकरिता मंजूर करण्यात येणाऱ्या खर्चाबाबतचे दंडक तयार करण्यात आलेले असून ते खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| दंडक क्र. ११८ | i) | Students participating in the sanctioned excursion tour organized by University Department shall be Paid ५०% T.A. at IInd Class confessional fare each way or ५०% S.T. bus fare. But shall not be paid any H.A and they shall be Paid ५०% incidental charges at १/३ of the actual IInd Class fare. |
| | ii) | (ii) On recommendation of the Head of the Department five percent student participants will be paid pocket allowance of Rs.५/- per day during the study tour in addition to the provision made in (i) above. |

वरील प्रमाणे सहलीच्या खर्चांची दंडक प्रणाली असून विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येणारे Pocket allowance खूपच कमी असल्याने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे Pocket allowance मध्ये वाढ करण्याची व त्यानुसार दंडक क्र.११८ (ii) मध्ये दुरुस्ती करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठ अधिविभागामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास सहलीच्या वेळी संबंधित अधिविभाग प्रमुखाने शिफारस केल्यानुसार मंजूर करण्यात येणाऱ्या Pocket allowance मध्ये वाढ करुन तो रु.५/- ऐवजी रु.२५/- प्रति दिवस करण्यास आणि ५% सहभागी विद्यार्थ्यांऐवजी १०% सहभागी विद्यार्थ्यांना Pocket Allowance देण्यास मान्यता देण्यात येवून त्यानुसार दंडक क्र. ११८ (ii) मध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**[ ०५ ] विद्यापीठास मनुष्यबळ पुरवठादारामार्फत पुरविण्यात येत असलेले रोजंदारी संगणक लेखनिक मनुष्यबळ वेतनात वाढ करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठास मान्यपदे कमी असल्याने आणि त्यातील ५३ पदे अद्याप रिक्त असल्याने विद्यापीठास कांही कर्मचारी मनुष्यबळ पुरवठादारामार्फत घ्यावे लागतात. आज मितीस ३९ संगणक लेखनिक, ३ संगणक लेखनिक(एकत्रित वेतन) १० डाटा एंट्री ऑपरेटर, ८ वाहनचालक, ३ प्रयोगशाळा सहायक, ४ प्रयोगशाळा परिचर, ४ शिपाई, ८ माळी व ३२ चौकीदार इतके कर्मचारी मे. आयडियल एटरप्रायजेस, सोलापूर व मे. ए वन सेक्युरिटी, सोलापूर या मुनष्यबळ पुरवठादार संस्थेकडून विद्यापीठास ३, ५ व ११ महिन्याच्या कालावधी करिता मनुष्यबळ पुरविले जाते. त्यातील संगणक लेखनिकासाठी सदर संस्थेस किमान वेतन कायदा १९४८ नुसार प्रतिदिन प्रति कर्मचारी रु.२७२.१८ दराने (सेवा शुल्क दर रु.३.५०) वेतन आदा केले जाते. त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | संगणक लेखनिक (कुशल) |
|---|---|---|
| ०१ | किमान वेतन रु. | ५५००.०० |
| ०२ | महागाई भत्ता | १५७६.८० |
| ०३ | एकूण रुपये | ७०७६.८० |
| ०४ | प्रति दिन वेतन (अ.क्र.३÷२६) | २७२.१८ |
| ०५ | भविष्यनिर्वाह निधी कर्मचारी हिस्सा १२% | ८४९.२१ |
| ०६ | भविष्यनिर्वाह निधी प्रधान नियुक्त्याचा हिस्सा १३.६१% | ९६३.१५ |
| ०७ | ई.एस.आय. कर्मचारी हिस्सा १.७५% | १२३.८४ |
| ०८ | ई.एस.आय. प्रधान नियुक्त्याचा हिस्सा ४.७५% | ३३६.१४ |
| ०९ | पूरवठादाराचे सेवा शुल्क | रु.३.४० प्रति कर्मचारी प्रति दिवस (किमान २६ दिवसाकरिता रु.८८.४० |
| १० | व्यवसायक कर रु. @ १२.३६ (३+६+८+९) | १०४६.२१ |
| ११ | विद्यापीठाने आदा करावयाचे एकूण रु. (३+६+८+९+१०) | ९५१०.७० (२६ दिवसा करिता) (रु.३६५.७९ ~ ३६६ प्रति दिवस) |
| १२ | कर्मचाऱ्याला मिळणारा निव्वळ रक्कम (३-५-७) | ६१०३.७५~६१०४ (२६ दिवसा करिता) (रु.२३४.७६~२३५ प्रति दिन) |

सोलापूर शहरापासून विद्यापीठ हे ८ कि.मी. अंतरावर असल्याने कर्मचाऱ्यास प्रवास खर्च व इतर कपाती वजा निव्वळ वेतन रु.५०००/- संगणक लेखनिकास मिळते. तसेच महागाई निर्देशांकात वाढ झ ालेली आहे. त्यामुळे संगणक लेखनिक म्हणुन काम करणाऱ्या मनुष्यबळाच्या वेतनामध्ये वाढ करण्याची बाब व त्या अनुषंगाने EPF कायदयानुसार भविष्य निर्वाह निधी, प्रधान नियोक्ताच्या हिस्सा, प्रशासकीय खर्च तसेच ई.एस.आय. कायदयानुसार प्रधान नियुक्त्याचा हिस्सा आदा करण्याची बाब विचारार्थ सादर).

**ठराव : विद्यापीठातील एकत्रित वेतनावरील कर्मचारी वगळता मनुष्यबळ पुरवठादारामार्फत कार्यरत असणाऱ्या संगणक लेखनिक, डाटा एंट्री ऑपरेटर, वाहनचालक, प्रयोगशाळा सहायक, प्रयोगशाळा परिचर, शिपाई, माळी व चौकीदार या रोजंदारी वरील कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनामध्ये दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून १०% वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**[ ०६ ] सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांमधून गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरिता पात्र अध्यापकांच्या API प्रस्तावाचे मुल्यांकन करण्याकरिता शुल्क रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) ऐवजी रु. ४०००/- (अक्षरी रुपये चार हजार फक्त) करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांमधून गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरिता पात्र अध्यापकांच्या API प्रस्तावाचे मुल्यांकन करण्याकरिता प्रत्येकी रु.५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार फक्त) प्रमाणे फी आकारण्यास मा. कुलगुरु महोदय यांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये मान्यता दिली होती. (सदर बाबीची नोंद दिनांक ०७-११-२०१३ रोजीच्या विद्या परिषदेतील ठराव क्र. १८१ नुसार नोंद घेण्यात आलेली आहे.)

विद्यापीठाने API प्रस्तावाचे मुल्यांकन करण्याकरिता आकारलेले शुल्क रु.५०००/- ऐवजी रु. ४०००/- करण्यात यावे अशी विनंती सोबतच्या निवेदनामध्ये मा. अधिष्ठाता, कला व ललित कला विद्याशाखा यांनी केलेली आहे.

तसेच API प्रस्तावाचे मुल्यांकन करण्याकरिता आकारण्यात आलेल्या शुल्कास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८(v) मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव : सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांमधून गुणवत्तेवर आधारीत पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरिता पात्र अध्यापकांच्या API प्रस्तावाचे मुल्यांकन करण्याकरिता शुल्क रु.५,०००/- ऐवजी रु.४०००/- करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ] सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण संचालकांकरिता राष्ट्रीय पात्रता चाचणीबाबत.**

(टिपणी: अधिसभा सदस्य डॉ. चव्हाण सी. एस. यांनी दिनांक १६-११-२०१३ रोजीच्या अधिसभेमध्ये खालील प्रमाणे ठराव मांडला आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण संचालकांकरिता पात्रता चाचणी विद्यापीठाने आयोजित करावी किंवा त्यांना या अटीतून मुक्त करण्याकरिता विद्यापीठाने यु.जी.सी./शासनास विनंती करण्याची शिफारस अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**ठरावः सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. गायकवाड एस. पी. यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला.**

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने अधिसभेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव : सोलापूर विद्यापीठ परिक्षेत्रातील शारीरिक शिक्षण संचालकांकरिता राष्ट्रीय पात्रता चाचणी घेण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगास विनंती करण्याकरिता पत्र पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ] मे. मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लि., पुणे यांचे कडून विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुल या इमारतीचे एनर्जी ऑडीट करुन घेण्याची बाब विचरार्थ.**

(टिपणी: महाव्यवस्थापक (ऊर्जा संवर्धन), महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाराष्ट्र शासनाची संस्था), पुणे यांचेकडून शासकीय / निमशासकीय संस्थामध्ये उर्जा संवधर्नास चालना देण्यासाठी ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी रक्कम रु.२५.०० लाख अनुदान महाऊर्जा यांचेकडून उपलब्ध करुन देणार असल्याचे कळविले आहे. त्यानुसार या विद्यापीठात ऊर्जा संवर्धन तंत्रज्ञान पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठी रसायनशास्त्र संकुल या एका इमारतीची निवड करण्यात येवून त्याप्रमाणे महाव्यवस्थापक, ऊर्जा संवर्धन, पुणे यांचेकडे विचारणा करण्यात आलेली होती. त्यानुसार विद्यापीठाने प्रथम ऊर्जा परीक्षण करुन घ्यावे व ऊर्जा परीक्षण अहवालात सुचविलेल्या बाबींची अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक त्या कामांची सविस्तर अंदाजपत्रके व पथदर्शी प्रकल्प राबविण्यासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल महाऊर्जाकडे सादर करावा लागणार आहे. महाऊर्जाकडील नोंदणीकृत ऊर्जा परीक्षण सल्लागारांची यादी मधील रसायनशास्त्र इमारतीचे ऊर्जा परीक्षण करुन घेण्याबाबत मे. मिटकॉन कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस, पुणे यांचेकडे विचारणा केली असता, श्री. दिपक झाडे, सिनीयर व्हाईस प्रेसीडेंट, एनर्जी ॲन्ड कार्बन सर्व्हिसेस, मिटकॉन, पुणे यांनी एनर्जी ऑडीट करणेविषयीचे प्रस्ताव पाठविला होता. या प्रस्तावातील अदा करावयाच्या अटी विषयी विचारणा केली असता सुधारीत प्रस्ताव दि.२८/१०/२०१३ रोजीचा पाठविला आहे.

त्यानुसार या प्रस्तावामध्ये एकूण प्रोफेशनल फीस रु.८०,०००/- अधिक १२.३६% प्रोफेशनल टॅक्स असे नूमद केले असून त्यानुसार रु.८९,८८८/- इतकी रक्कम होत असून सदरील रक्कम ही प्रवास खर्च इ. सह असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे वर्क ऑर्डरसोबत ५०% व रिपोर्ट सबमिशन केल्यावर ५०% रक्कम देण्यात यावी असे नमूद केले आहे. तसेच सदरील प्रस्तावामध्ये त्यांनी ९ मधील अटी मान्य असल्यास टर्म ॲग्रीमेंट करावा लागेल असे नमूद केले आहे.

सबब, विद्यापीठाचे एनर्जी ऑडीट करुन घेण्यासाठी वरीलप्रमाणे मे. मिटकॉन कन्सल्टंन्सी सर्व्हिसेस, पुणे यांचेसोबत करार करणेची बाब विचारार्थ).

**ठराव : मे. मिटकॉन कन्सल्टंन्सी ॲन्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस लि., पुणे यांचे कडून विद्यापीठ परिसरातील रसायनशास्त्र संकुल या इमारतीचे एनर्जी ऑडीट करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

(टिपणीः तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर दि.०४/१२/२०१३ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि.०४/१२/२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये तक्रार निवारण समितीमध्ये संबंधित प्रकरणांबाबत शिफारशी केलेल्या आहेत.

सदरच्या शिफारशींना परिनियम ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

**ठराव : तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] सोलापूर विद्यापीठात "ई-ऑफीस" कार्यप्रणाली राबविण्यास, त्याअनुषंगाने आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करण्यास व अनुषंगिक सुविधा उपलब्ध करण्यास प्रशासकीय मान्यतेबाबत.**

(टिपणी: मा.कुलपती कार्यालयाच्या पत्र जा.क्र.CS/GEN/३७/१३/(७८७७)/२६८७-८८, दि.०३/०८/२०१३ रोजीच्या पत्रानुसार, कामाचे डुप्लीकेशन टाळण्यासाठी महामहीम कुलपती कार्यालयास करावयाचा पत्रव्यवहार हा ईमेलद्वारे किंवा पोस्टाद्वारे कशा प्रकारे करावा याबाबत कळविण्यात आले आहे.

सदर पत्रात 'महाराष्ट्र शासनाने नॅशनल इन्फॉरमॅटिक्स सेंटर (NIC) यांच्याकडून "ई-ऑफीस (E-OFFICE)" कार्यप्रणाली स्विकारली असल्याने विद्यापीठाने देखील ती स्विकारावी जेणेकरुन विद्यापीठ, शासन आणि मा.कुलपतींचे कार्यालय यांच्यामधील पत्रव्यवहार सारख्याच प्रकारचा राहील' असेही कळविले असून ही प्रणाली विद्यापीठास सुरु करण्यासंदर्भात नॅशनल इन्फॉरमॅटिक्स सेंटर (NIC) चे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक श्री. मोईज हुसेन यांच्याशी किंवा नॅशनल इन्फॉरमॅटिक्स सेंटर (NIC) चे जिल्हा माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आले होते.

यानुसार, श्री. मोईज हुसेन, समन्वयक, महाराष्ट्र राज्य, नॅशनल इन्फॉमॅटिक्स सेंटर (NIC), मुंबई यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्र. सोविसो/कु.का./४६३७, दि.०३/१०/२०१३ अन्वये, सोलापूर विद्यापीठामध्ये "ई-ऑफीस (E-OFFICE)" कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याबाबत या कार्यप्रणालीचे प्रात्यक्षिक देण्याबाबत सोयीची तारीख व वेळ देण्याबाबत कळविले होते. या अनुषंगाने, श्री. मोईज हुसेन यांना पुनश्चः एकदा पत्र जा.क्र. सोविसो/कु.का./५८८६, दि.२६/११/२०१३ च्या पत्रान्वये यासंदर्भात कळविले होते.

श्री. मोईज हुसेन यांच्याशी यानंतर झालेल्या दूरध्वनीवरील चर्चेनंतर, सोलापूर विद्यापीठामध्ये "ई-ऑफीस (E-OFFICE)" कार्यप्रणाली कार्यान्वित करण्याकरिता नॅशनल इन्फॉमॅटिक्स सेंटर यांच्या दिल्ली येथील मुख्यालयाकडे दि.१८/१२/२०१३ रोजीच्या ईमेलद्वारे परवानगी मगितल्याचे श्री. आयरेनी ए. सायंटिस्ट डी, एन. आय. सी., एम. एच. एस. सी., मुंबई यांनी कळविले आहे.

यानंतर, सोलापूरच्या एन. आय. सी. विभागाचे श्री. मोहनकुमार बशिराबादकर यांनी दि.०८/०१/२०१४ रोजी विद्यापीठास समक्ष भेट देवून ई-ऑफीस कार्यप्रणालीची माहिती दिली.

ई-ऑफीस कार्यप्रणाली विद्यापीठात राबविण्यापूर्वी खालील बाबींची आवश्यकता

असल्याचे तसेच माहिती तंत्रज्ञान (सा. प्र. वि.) विभागाच्या दि.२०/०८/२०१३ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

१) एन. आय. सी. चे ईमेल अकाऊंट.

२) डिजिटल सर्टिफिकेट.

३) कनेक्टिव्हिटी - SWAN/NICNET/VPN

४) मध्यवर्ती टपाल केंद्राची निर्मिती करणे.

५) अद्यावत क्षमतेचे संगणक (Configuration).

६) उच्च क्षमतेचे स्कॅनर व प्रिंटर.

वरीलप्रमाणे यंत्रसामुग्री उपलब्ध केल्यानंतर एन. आय. सी. च्या eOffice Support Cell Mumbai यांच्या मदतीने पुढील कार्यवाही करता येईल.

सबब, सोलापूर विद्यापीठामध्ये वरीलप्रमाणे ई-ऑफीस कार्यप्रणाली राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची व ही कार्यप्रणाली राबविताना आवश्यक असलेल्या यत्रसामुग्री व सुविधा उपलब्ध करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठात "ई-ऑफीस" कार्यप्रणाली राबविण्यास, त्याअनुषंगाने आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करण्यास व अनुषंगिक सुविधा उपलब्ध करण्यास सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ]** **प्रा. आर. डी. गुंड व प्रा. ए. आर. माने यांनी केलेल्या तक्रारीबाबतचा निर्णय पुनर्विचारार्थ सादर.**

(टिपणी: प्रा. आर. डी. गुंड व प्रा. ए. आर. माने यांनी केलेल्या तक्रारीबाबत कार्यालयीन माहिती खालीलप्रमाणे.

१. श्री. आर. डी. गुंड व श्री. ए. आर. माने यांनी सादर केलेल्या तक्रारी अर्जावार पुर्णपणे सुनावणी होवून दि.१६/०३/२०१२ रोजी तक्रार निवारण समितीने खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

अ) मे, २००८ पासून ते आजपर्यंतचे वेतन संस्थेचे तक्रारदारांना आदा करावी.

ब) ०१ जानेवारी १९९६ पासून पाचव्या वेतन आयोगानुसार व ०१ जानेवारी, २००६ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे फरकाची रक्कम तक्रारदारांना त्वरीत आदा करावी.

क) सन २०११ पासून थकीत असलेली प्रॉव्हीडंड फंडाची रक्कम (पी.एफ.) संबंधित कार्यालयाकडे त्वरीत भरावी.

ड) संस्थेने तक्रारदाराचे सेवा पुस्तक अद्यावत करुन संबंधितांना द्यावे.

२. सदरचा ठराव हा व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आला व दि.२८/०३/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आला व दि.२८/०३/२०१२ रोजीच्या व्यवस्थापन बैठकीमध्ये ठराव क्र. ०८ अन्वये मान्य करण्यात आला.

३. त्यानुसार सदरच्या ठरावाप्रमाणे कारवाई करुन त्याचा अहवाल व संबंधित कागदपत्रे विद्यापीठास सादर करण्याबाबत गैर तक्रारदार संस्थेस दि.०७/०४/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते व त्यानंतर दि.०९/०५/२०१२ रोजी संबंधित संस्थेस तक्रारी अर्जावरील झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत स्मरणपत्रे देण्यात आलेले आहेत.

४. तद्नंतर संस्थेने मा. पोलिस निरीक्षक, मोहोळ पोलिस स्टेशन, मोहोळ येथे कागदपत्रे गहाळ झालेले बाबतची तक्रार नोंदवून श्री. आर. डी. गुंड व श्री. ए. आर. माने यांच्या विरुध्द तक्रार करण्यात आलेली असल्याबाबत विद्यापीठास कळविले. त्यानुसार विद्यापीठाने मा. पोलिस निरीक्षक, मोहोळ पोलिस स्टेशन, मोहोळ यांना पत्र पाठवून तक्रारी अर्जास अनुसरुन तपासाचे अंतिम निष्कर्ष कळविण्याबाबत विनंती केलेली होती.

५. सदर पत्रास अनुसरून मा.पोलिस निरीक्षक, मोहोळ पोलिस स्टेशन, मोहोळ यांनी दि.२८/०५/२०१३ रोजी पत्र पाठवून सदर गहाळ प्रकरणाचे कागदपत्रांची आजतागायत चौकशी, तपास केला परंतू आद्यापर्यंत गहाळ झालेले कागदपत्रे मिळालेले नाहीत असे नमूद करुन सदर गहाळ प्रकरणाची मुदत पोलिस मॅन्युअल प्रमाणे दोन वर्ष असल्याने सदर गहाळ प्रकरणे नाश करण्यात आलेली आहेत असे कळविलेले आहे.

६. यानंतर मुद्दा क्र.१ अन्वये सदरच्या प्रकरणाबाबत तक्रार निवारण समितीने घेतलेला निर्णयावर मुद्दा क्र.२ अन्वये व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या मुद्दा क्र.३ मध्ये दिलेल्या पत्रान्वये

संबधीत संस्थेला निर्णयावर कार्यवाई करण्याबाबत कळविण्यात आलेला होता.

७. यानंतर संबधीत संस्थेला कारवाई बाबत दि.११/०७/२०१३ रोजी अजुन एक स्मरण पत्र देण्यात आले.

८. दि.२५/०९/२०१३ च्या पत्राद्वारे श्री. आर. डी.गुंड व श्री. ए. आर. माने यांनी संस्थेकडून संबधित प्रकरणाबाबत घेतलेल्या निर्णयाबाबत कोणतेच कार्यवाही होत नसल्याबाबत कळविलेले आहेत.

९. याबाबत विद्यापीठाच्या कायदा अधिकारी यांचे संबधित प्रकरणाबाबत मत घेतले असता सदरचे प्रकरण पुन्हा एकदा व्यवस्थापन समितीच्या पुन:विचारार्थ सादर करण्यासंबधी सल्ला दिला आहे.

वरील सर्व गोष्टी अवलोकनी घेता संस्थेला कळविण्यात आलेला निर्णयावरील कारवाई करुन त्याबाबतचा कार्यवाही अहवाल परिनियम ३३६ अन्वये, विहीत वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतिसह या कार्यालयाकडे सादर करण्याबाबत वारंवार कळवुनही संस्थेने निर्णयाची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसुन येते व विद्यापीठ आदेशाचे पालन करत नसल्याचे दिसुन येते.

याबाबतचा सदरचा विषय पुनःश्च व्यवस्थापन परिषदेसमोर सादर).

**ठराव :** **याबाबत व्यवस्थापन परिषदेचा निर्णय संबंधितांना कळविला असून त्यानुसार कार्यवाही करावी व यासंदर्भात विद्यापीठाशी पत्रव्यवहार करु नये असे संबंधितास कळवावे असे ठरले.**

**[ १२ ] मे. नॅशनल कुशन मेकींग, सोलापूर यांनी विद्यापीठ परिसरातील संकुल व इमारतीमध्ये पडदे बसविल्याच्या कामाचे देयक आदा करण्याची बाब आदेशार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाच्या संकुलामधील खिडक्यांना पडदे बसविणे कामाची वार्षिक दर करार करणे कामासाठी दि.२१/०८/२०१२ रोजी दै.पुण्यनगरी व दै.पुढारी या वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्दीस दिली होती. निविदा पोहोच करण्याची अंतिम तारीख दि.३१/०८/२०१२ रोजी होती. दिलेल्या मुदतीत एकूण दोन निविदा प्राप्त झाल्याने दै.पुढारी या वर्तमानपत्रात पहिली मुदतवाढीची सुचना प्रसिध्दीस दिली त्याची अंतिम तारिख १०/०९/२०१२ रोजी होती. परंतु दिलेल्या मुदतीत देखील एकही निविदा प्राप्त न झाल्याने दै. सकाळ या वर्तमानपत्रात दुसरी मुदतवाढ दिली. त्यांची अंतिम मुदत दि.१८/०९/२०१२ होती. दिलेल्या मुदतीत एकही निविदा प्राप्त झाली नाही. सबब विषयांकित कामासाठी प्रथम जाहीर निविदा व त्यास दोन वेळा मुदतवाढ अशी कार्यवाही करुनही दोनच निविदा प्राप्त झाल्या सदरच्या दोन निविदा उघडण्यास मा.कुलगुरुमहोदय यांची मान्यता दि.२५/०९/२०१२ रोजी घेण्यात आलेली होती. सदरच्या दोनच निविदा उघडण्यात येवून इमारतीमध्ये पडदे बसविणे कामाचे वार्षिक दर करार करणेचे काम मे. नॅशनल कुशन मेकींग, सोलापूर यांचेसी पडदा कापड रु.९०/- प्रति रनिंग व पडदा पाईप रु.१९०/- या दराने करण्याची बाब बांधकाम समिती सभा दि.१९/१०/२०१२ रोजीच्या बैठकीत मान्य करण्यात आली. त्या कार्यवृत्ततांस व्यवस्थापन परिषद बैठक दि.३०/१०/२०१२ रोजीच्या ठराव क्र.०८ नुसार मान्यता देण्यात आली.

त्यानुसार मे. नॅशनल कुशन मेकींग, सोलापूर यांना विद्यापीठ कार्यालयाचे पत्र जा.क्र.५०३ दि.२२/०४/२०१३ व जा.क्र.१८०७ दि.१२/०६/२०१३ अन्वये विद्यापीठ परिसरातील विविध संकुलांमध्ये पडदे बसविण्याची वर्क ऑर्डर देण्यात आली. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर मक्तेदाराने दि.२१.०६.२०१३ रोजी रक्कम रु. ७८,२५०/- व दि.२४/०६/२०१३ रोजी रक्कम रु.६९,७१०/- इतक्या रकमेचे बिल विद्यापीठास सादर केले. सदर कामाची मा.कुलगुरु महोदय यांनी नियुक्त केलेल्या प्रा.डॉ.चिंचोलकर आर.बी. व डॉ.लोखंडे बी.जे. या समितीने तपासणी करुन "curtain cloth, sockets and metal rods are not provided as per the specifications given by University" असा अहवाल दिला.

मंजूर निविदेतील अट क्र.११ iii) In case of sub standard material the first party shall have to replace the same within 7 days otherwise penalty of Rs. 200/- per day will be charged and २% penalty of the cost of material due to sub standard supplying अशी दंडाची तरतूद आहे. त्यानुसार सदरच्या कामासाठी कमी प्रतीचे मटेरियल

वापरल्याबाबतचा खुलासा मक्तेदार मे. नॅशनल कुशन मेकींग, सोलापूर यांच्याकडून मागविण्यात आला. त्यास अनुसरुन मक्तेदाराने निविदेतील दिलेल्या स्पेसिफिकेशन दराप्रमाणे मटेरियल उपलब्ध नसल्याने व कामाची अत्यंत तातडी व वेळेची मर्यादा विचारात घेता, वापरण्यात आलेल्या सॉकेट व इतर मटेरियल कमी प्रतीचे वापरलेले आहेत व विद्यापीठातील खिडक्यांना पडदे बसविण्याची संपूर्ण काम रात्रंदिवस व वेळेत पूर्ण केल्याचे मक्तेदाराने कळवून आम्हांला सदर कामाचे बिल हे विद्यापीठाच्या योग्य त्या नियमानुसार कार्यवाही करुन आदा करावे अशी विनंती केलेली आहे.

त्यामुळे कमी प्रतीच्या वापरलेल्या मटेरियलचे चालू बाजारभावाप्रमाणे दर चौकशी करुन त्याचे दर पृथकःरण केले असता, पडदा कापड रु.८०/- प्रति रनिंग मीटर व पडदा पाईप रु.१३५/- प्रति रनिंग मीटर इतके दर आहेत.

मक्तेदाराचे देयक साधारणतः ६ महिन्या पासुन प्रलंबीत असल्याने उपलब्ध प्रतीच्या मटेरियल नुसार पडदे बसवुन घेतले असल्याने मे. नॅशनल कुशन मेकींग, सोलापूर यांना आकारलेली per day penalty of Rs. 200/- आणि 2% penalty of the Cost माफ करुन चालू बाजारभावाप्रमाणे दर पृथःकरण केलेले पडदा कापड रु.८०/- प्रति रनिंग मीटर व पडदा पाईप रु.१३५/- प्रति रनिंग मीटर या दरानुसार देयक अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या आदेशार्थ सादर).

ठराव : **मे. नॅशनल कुशन मेकींग, सोलापूर यांनी, विद्यापीठाने पृथ्थःकरण केलेले रु.८०/- व रु.१३५/- हे दर मान्य असल्याचे हमीपत्र आणि विद्यापीठाने आकारलेला दंड माफ करण्याबाबतचे विनंती पत्र विद्यापीठास दिल्यानंतर रु.२००/- प्रतिदिन आणि किंमतीच्या २% असलेला दंड माफ करुन विद्यापीठ परिसरातील संकुल व इमारतीमध्ये पडदे बसविल्याच्या कामाचे देयक आदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**